आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांक:**10.03.2026** वार: मंगळवार

---

१)पश्चिम आशियातला तणाव कमी करण्यासाठी मुत्सद्देगिरी आणि संवाद हेच प्रभावी माध्यम असल्याचं, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांचं प्रतिपादन
२)तेल शुद्धीकरण कारखान्यांना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे सरकारचे आदेश
३)पंतप्रधान नरेंद्र मोदी आज केरळ आणि तमिळनाडूला भेट देणार
आणि
४) महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांचा आज शपथविधी

एस. जयशंकर

पश्चिम आशियातला तणाव कमी करण्यासाठी मुत्सद्देगिरी आणि संवाद हेच प्रभावी माध्यम असल्याचं, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा कालपासून सुरू झाला. यावेळी परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी दोन्ही सभागृहांमध्ये पश्चिम आशियातील परिस्थितीबाबत निवेदन सादर केलं. पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर सरकारचं लक्ष असून नागरिकांच्या सुरक्षेला आपलं प्राधान्य असल्याचं ते म्हणाले. भारत शांततेच्या बाजूने असून, या भागात निर्माण झालेला तणाव कमी करण्याचं आवाहन करत असल्याचं, जयशंकर यांनी लोकसभेत सांगितलं.

आखाती देशांमध्ये सुमारे एक कोटी भारतीय नागरिक राहतात; ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने तसंच तेल आणि वायू पुरवठ्यासाठीही हे देश महत्त्वाचे आहेत; त्यामुळे इथल्या संघर्षाचा परिणाम सामान्य जनजीवनावर आणि कामकाजावरही होत असल्याचं जयशंकर यांनी राज्यसभेत सांगितलं.

दरम्यान, लोकसभेत विरोधकांनी पश्चिम आशियातल्या परिस्थितीवरून घोषणाबाजी सुरू केली. यामुळे कामकाज आधी एकदा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

संसद

लोकसभेत आज सभापती ओम बिर्ला यांच्या विरोधात अविश्वास ठराव मांडला जाणार आहे. मोहम्मद जावेद, के सुरेश आणि मल्लू रवी हे तीन काँग्रेस सदस्य हा ठराव मांडतील. पश्चिम आशियावरील चर्चेच्या मागणीवर विरोधकांच्या गदारोळामुळे हा ठराव काल मांडण्यात आला नाही. हा ठराव मांडला गेला तर ओम बिर्ला कामकाजाचे अध्यक्षपद भूषवणार नाहीत आणि त्याऐवजी ते सदस्यांमध्ये बसतील.

एस. जयशंकर

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल नवी दिल्लीतील अमेरिका भारत बिझनेस कौन्सिल ग्लोबल बोर्ड ऑफ डायरेक्टर्स मिशनशी संवाद साधला. भारत-अमेरिका आर्थिक भागीदारीच्या वर्तमान आणि भविष्याबद्दल जागतिक स्तरावरील अडचणी असूनही, व्यावसायिक नेत्यांमध्ये आशावाद कायम आहे,ही बाब अतिशय उत्साहवर्धक आहे, असं त्यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

एस. जयशंकर यांनी काल इटलीचे परराष्ट्र व्यवहारमंत्री अँटोनियो ताजानी यांच्याशी पश्चिम आशियातील परिस्थितीवर दूरध्वनीवरून चर्चा केल्याचंही समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

सरकार-एलपीजी

सरकारने तेल शुद्धीकरण कारखान्यांना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे आदेश दिला आहेत. या अतिरिक्त उत्पादनाचा वापर घरगुती गॅस सिलेंडरसाठी करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. सरकारनं घरगुती एलपीजी पुरवठ्याला प्राधान्य दिलं असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं म्हटलं आहे. साठवणूक आणि काळाबाजार टाळण्यासाठी दोन सिलेंडरमधील नोंदणीचा कालावधी २५ दिवसांचा करण्यात आला आहे. आयात केलेल्या एलपीजीमधून घरगुती पुरवठा न करता रुग्णालये आणि शैक्षणिक संस्थांसारख्या  क्षेत्रांना प्राधान्य दिले जात आहे. दरम्यान, रेस्टॉरंट, हॉटेल आणि इतर उद्योगांना एलपीजी पुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी तेल विपणन कंपन्यांच्या तीन कार्यकारी संचालकांची समिति स्थापन करण्यात आली असल्याचंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

दरम्यान, देशात अंदाजे १९० कोटी मेट्रिक टनांपेक्षा जास्त वापरायोग्य तेलइंधन साठा, तसंच नैसर्गिक वायू इंधनाचा १ हजार ८०० अब्ज घनमीटरपेक्षा जास्त साठा उपलब्ध असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी काल राज्यसभेत एका लेखी उत्तरात दिली. देशात कच्च्या तेलाचा ४२ कोटी मेट्रिक टनापेक्षा जास्त आणि नैसर्गिक वायूचा ५९५ अब्ज घनमीटरपेक्षा जास्त साठा असल्याचं त्यांनी सांगितलं.

ट्रम्प-इराण युद्ध

इराणने जगाचा तेल पुरवठा थांबवण्याचा प्रयत्न केला तर हे युद्ध अधिक काळ सुरू राहू शकते, असा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.  अमेरिकेने अंतिम विजय मिळवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. अमेरिकेने इराणच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा साठा आणि ते तयार करण्याची क्षमता बऱ्याच अंशी नष्ट केली आहे, असेही त्यांनी सांगितलं. मोज्तबा खामेनी यांची निवड निराशजनक असल्याचंही ट्रम्प यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

ट्रम्प-पुतीनचर्चा

इराण विरुद्ध सुरू असलेल्या युद्धावर लवकरात लवकर राजकीय तोडगा काढण्यात यावा असं आवाहन रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी केलं आहे. त्यांनी काल अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षडोनाल्ड ट्रम्प यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा झाली, अशी माहिती पुतीन यांचे राजनैतिक सल्लागार युरी ऊशकोव यांनी दिली. चर्चेदरम्यान, पुतीन यांनी ट्रम्प यांना, युक्रेनमध्ये रशियन सेना घेत असलेल्या आघाडीबाबत माहिती दिली.

भारतीय दूतावास

गेल्या तीन दिवसांत दोहामध्ये प्रवास किंवा अल्पकालीन भेटींसाठी आलेले सुमारे एक हजार भारतीय नागरिक कतार एअरवेजच्या विमानांनी मायदेशात रवाना झाले असल्याचं कतारमधील भारतीय दूतावासानं म्हटलं आहे. कतार एअरवेजने काल चालवलेल्या दोहा-नवी दिल्ली विमानातून ३०० हून अधिक भारतीय प्रवासी मायदेशी आले.

पंतप्रधान -केरळ दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज केरळ आणि तामिळनाडूला भेट देणार आहेत. केरळमध्ये ते दुपारी एर्नाकुलम इथं सुमारे १०,८०० कोटी रुपयांच्या अनेक

विकास प्रकल्पांचं उद्घाटन, लोकार्पण, पायाभरणी करणार आहेत. कार्यक्रमादरम्यान ते उपस्थितांना संबोधितही करतील. त्यानंतर ते तमिळनाडूमध्ये तिरुचिरापल्ली इथं सुमारे ५,६५० कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन, लोकार्पण आणि पायाभरणी करतील.

पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळमधील निवडणुकीत विजयी झालेले राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाचे अध्यक्ष रबी लामिछाने आणि आरएसपीचे वरिष्ठ नेते बालेंद्र शाह यांचं अभिनंदन केलं आहे. त्यांच्याशी दूरध्वनीवरून झालेल्या संभाषणात मोदींनी यांनी त्यांच्या नवीन सरकारसाठी शुभेच्छा दिल्या आणि दोन्ही देशांच्या परस्पर समृद्धी, प्रगती आणि कल्याणासाठी त्यांच्यासोबत काम करण्याची भारताची वचनबद्धता व्यक्त केली. येत्या काळात भारत आणि नेपाळमधील संबंध नवी उंची गाठतील असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

पंतप्रधान

देशभरात आरोग्य क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत झाल्या असून प्रतिबंधात्मक आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवा क्षेत्रात भारत सक्षमपणे वाटचाल करत असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. “सबका साथ सबका विकास; जनतेच्या आकांक्षाची पूर्तता”, या संकल्पनेवर आधारित अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला त्यांनी काल संबोधित केलं. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या क्षेत्रात महिलांचा वाढता सहभाग अभिमानास्पद असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

वैष्णव

देशातील क्रिएटर अर्थव्यवस्था देशाची संस्कृती, खाद्यपरंपरा आणि स्थानिक उत्पादने जगासमोर सादर करत आहे, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. सबका साथ, सबका विकास - लोकांच्या आकांक्षा या संकल्पनेवर आधारित अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमध्ये ते बोलत होते. भारतीय क्रिएटरना मदत करण्यासाठी वेव्हज प्लॅटफॉर्मची निर्मिती करण्यात आली असून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीजचं पहिलं केंद्र मुंबईत स्थापन करण्यात येत असल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं.

राज्यपाल पूल-प्राची

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांचा शपथविधी आज संध्याकाळी मुंबईत लोकभवन इथं होणार आहे. मुंबई उच्च न्यायलयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय त्यांना शपथ देतील. जिष्णुदेव वर्मा यांचं काल मुंबईत सपत्नीक आगमन झालं. लोकभवन इथं नवनियुक्त राज्यपालांना पोलिसांनी मानवंदना दिली.

पश्चिम आशियायुद्ध

पश्चिम आशियातील संघर्षामुळे आर्थिक बाजारपेठेत वाढलेल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर, भांडवल बाजार नियामक सेबीचे अध्यक्ष तुहिन कांता पांडे यांनी गुंतवणूकदारांना घाबरून न जाता, शांत राहण्याचं आवाहन केलं आहे. काल मुंबईत काल निफ्टी ५० निर्देशांकाच्या ३० व्या वर्षावानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

हॉकी

एफ आय एच महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठीच्या पात्रता फेरीचे सामने सुरू आहेत. काल हैदराबादमध्ये खेळल्या गेलेल्या, ‘ब’ गटातील, भारत आणि स्कॉटलंड संघात झालेला सामना 2-2 असा बरोबरीत सुटला. पहिल्या सत्रात भारतीय संघाने सामन्यावर मजबूत पकड घेतली होती. मात्र, स्कॉटलंड संघाने जिद्दीने खेळ करत बरोबरी साधली.

स्विस- ओपन बॅडमिंटन

स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, भारताचे एच.एस. प्रणॉय आणि किदाम्बी श्रीकांत भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहेत. पुरुष एकेरीत, किदाम्बी श्रीकांत उद्या हाँगकाँगच्या जेसन गुणवान विरुद्ध सलामीला येईल, तर एच. एस प्रणॉय जपानच्या कोकी वातानाबेविरुद्ध लढेल. पुरुष दुहेरीत, सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी सिंगापूरच्या इंजी कीट वेस्ली कोह आणि जुनसुके कुबो यांचा सामना करतील. महिला गटात उन्नती हुडा चिनी तैपेईच्या चियू पिन-चियानशीतर  मालविका बनसोड थायलंडच्या पोर्नपावी चोचुवोंगशी लढत देईल.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**